**<u>ठळक बातम्या</u>**

- लोकसभा निवडणुकीच्या सातव्या आणि अखेरच्या टप्प्यातल्या मतदानाला सुरुवात, सर्व ५७ मतदारसंघांमध्ये सुरळीत आणि शांततेत मतदान सुरू

- देशातल्या औष्णिक वीज प्रकल्पात येत्या १९ दिवसांची गरज भागवू शकेल इतका पुरेसा कोळसा उपलब्ध असल्याची कोळसा मंत्रालयाची माहिती.

- पाकव्याप्त काश्मीर हा पाकिस्तानचा भाग नसल्याचं पाकिस्तान सरकारची इस्लामाबाद उच्च न्यायालयात कबूली

**आणि**

- उष्माघातामुळे देशाच्या विविध भागात गेल्या दोन दिवसात उष्माघाताचे ५० पेक्षा जास्त बळी, अनेक राज्यात उष्णतेची तीव्र लाट कायम राहील असा हवामान विभागाचा इशारा.

**<><><><><>**

**लोकसभेच्या सातव्या** आणि शेवटच्या टप्प्यासाठी आज आठ राज्यं आणि एका केंद्रशासित प्रदेशात मतदान सुरू आहे. यात ५७ मतदारसंघांमध्ये ९०४ उमेदवार आपलं नशीब आजमावत आहेत. तर १० कोटी ६० लाख मतदार आपला मतदानाचा अधिकार बजावणार आहेत. सकाळी सात वाजता मतदानाला सुरुवात झाली असून संध्याकाळी सहा वाजेपर्यंत मतदान सुरू राहील.

सकाळी अकरा वाजेपर्यंत २६ पूर्णांक ३० शतांश टक्के मतदानाची नोंद झाली आहे.

या टप्प्यात उत्तरप्रदेश आणि पंजाबमधल्या १३, पश्चिम बंगालमधल्या ९, बिहारमधल्या ८, ओदिशातल्या ६, हिमाचल प्रदेशातल्या ४, झारखंडमधल्या ३ आणि चंडीगडमधल्या एका जागेसाठी मतदान होत आहे. प्रधानमंत्री आणि भाजपाचे ज्येष्ठ नेते नरेंद्र मोदी यांच्या वाराणसी मतदारसंघातही आज मतदान होत आहे.

केंद्रीय मंत्री अनुराग ठाकूर, रवीशंकर प्रसाद, कंगना रनौत हे भाजपाचे उमेदवार या टप्प्यात रिंगणात आहेत. तर काँग्रेस नेते मनीष तिवारी, विक्रमादित्य सिंग, राजद नेत्या मिसा भारती, तृणमूल काँग्रेसचे नेते अभिषेक बॅनर्जी यांच्या मतदारसंघातही आज मतदान होत आहे.

दरम्यान, **ओदिशा** विधानसभेच्या ४२ जागांसाठीही आज मतदान सुरू आहे. तर हिमाचल प्रदेशमधल्या सहा आणि बिहार, उत्तरप्रदेश आणि पश्चिम बंगालमध्ये विधानसभेच्या प्रत्येकी एका जागेसाठी पोटनिवडणूक होत आहे.

**<><><><><>**

लोकसभेच्या सातव्या आणि शेवटच्या टप्प्यात नागरिकांना मतदान करण्याचं आवाहन प्रधानमंत्री आणि भाजपाचे ज्येष्ठ नेते नरेंद्र मोदी यांनी समाजमाध्यमाद्वारे केलं. महिला आणि तरुणांनी मोठ्या प्रमाणात मतदान करावं. लोकशाहीला अधिक सर्वसमावेशी बनवावं असंही मोदी म्हणाले.

**<><><><><>**

देशात विजेची मागणी वाढलेली असतानाही, औष्णिक वीज प्रकल्पातील कोळशाचा सद्यस्थितीतला साठा ४५ मेट्रिक टनांपेक्षा जास्त असल्याचे कोळसा मंत्रालयाने म्हटले आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत हा साठा ३० टक्क्यांपेक्षा जास्त असल्याचे मंत्रालयाने कळवले आहे. देशाची १९ दिवसांची गरज भागविण्यासाठी हा साठा पुरेसा असेल. पावसाच्या हंगामात औष्णिक विद्युत प्रकल्पांमध्ये कोळशाचा पुरेसा

साठा उपलब्ध असायला हवा यासाठी आम्ही सज्ज आहोत, येत्या १ जुलै २०२४ रोजी औष्णिक विद्युत प्रकल्पांमध्ये ४२ मेट्रीक टन कोळसा उपलब्ध होईल, असंही मंत्रायलयानं कळवले आहे.

**<><><><><>**

तेल पणन कंपन्यांनी इंधनासाठी वापरल्या जाणाऱ्या व्यावसायिक एल पी जी गॅसच्या दरात प्रति युनिट ६९ रुपये ५० पैशांनी कपात केली आहे. दिल्लीमध्ये एल पी जी गॅस सिलेंडरचे दारू १ हजार ६७६ रुपये राहील असं भारतीय तेल महामंडळ कंपनीनं सांगितलं आहे. कोलकात्यात व्यावसायिक एल पी जी गॅस सिलेंडरच्या दरात ७२ रुपयांनी, मुंबईत ६९ रुपये ५० पैशांनी तर चेन्नईत ७० रुपये ५० पैशांनी कपात झाली असून नवीन दर आजपासूनच लागू होतील.

**<><><><><>**

पुण्यातल्या कल्याणीनगर कार अपघातात अल्पवयीन आरोपीची आई शिवानी अगरवाल हिला काल पुणे पोलिसांनी अटक केली. हिच्यावर आरोपीच्या रक्ताचे नमुने बदलून त्याला बाहेर पडण्यासाठी मदत केल्याचा संशय आहे. शिवानी हिला आज पुणे न्यायालयात हजर करण्यात येणार आहे. दरम्यान, या प्रकरणातल्या न्यायवैद्यक प्रयोगशाळेत काम करणाऱ्या दोन महिला परिचारिकांची चौकशीही गुन्हे शाखेकडून करण्यात आली. रक्ताचे नमुने बदलण्यात डॉ. तावरे, डॉ. श्रीहरी हाळनोर आणि शिपाई अतुल घटकांबळे यांची महत्त्वाची भूमिका असल्याचं आजवरच्या तपासात निष्पन्न झालं आहे.

**<><><><><>**

केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाच्या बेंगळुरू इथल्या निम्हन्स अर्थात राष्ट्रीय मानसिक आरोग्य आणि मज्जाविज्ञान संस्थेला जागतिक आरोग्य

संघटनेचा यंदाचा नेल्सन मंडेला आरोग्य जनजागृती पुरस्कार मिळाला आहे. आरोग्यविषयक जनजागृती क्षेत्रात व्यक्ती, संस्था तसंच सरकारी किंवा बिगर सरकारी संस्थांनी केलेल्या उल्लेखनीय योगदानासाठी हा पुरस्कार जागतिक आरोग्य संघटनेकडून २०१९ पासून दरवर्षी दिला जातो.

केंद्रीय आरोग्य मंत्री डॉक्टर मनसुख मांडवीया यांनी याबद्दल संस्थेचं अभिनंदन केलं असून हा पुरस्कार म्हणजे सर्वसमावेशक आरोग्यसेवेमधल्या भारताच्या प्रयत्नांना मिळालेली पावती असल्याचं म्हटलं आहे.

**<><><><><>**

पाकव्याप्त काश्मीर हा पाकिस्तानचा भाग नसल्याचं पाकिस्तान सरकारनं इस्लामाबाद उच्च न्यायालयात कबूल केलं आहे. पाकिस्तानव्याप्त काश्मीरमधले पत्रकार अहमद फरहाद शाह यांच्यावर सुरू असलेल्या खटल्यावेळी पाकिस्तान सरकारने न्यायालयाला हे सांगितलं. काश्मीर हा पाकिस्तानचा भाग नाही तर पाकिस्तानी लष्कर या भागात का जातं, असा प्रश्न न्यायालयाने यावेळी सरकारला विचारला. तसंच लोकाचं जबरदस्ती अपहरण करत असल्याचं सांगत पाकिस्तानी गुप्तचर संस्थेवरही न्यायालयाने ताशेरे ओढले आहेत.

**<><><><><>**

बोलक्या बाहुल्यांचे खेळ करणारे सुप्रसिद्ध कलाकार पदमश्री मागूनी चरण कुआँर यांचं आज ओदिशात केओनझार इथं त्यांच्या राहत्या घरी दीर्घ आजारानं निधन झालं. ते ८८ वर्षांचे होते. कुआँर यांच्या प्रदीर्घ कला प्रवासाबद्दल त्यांना गेल्या वर्षी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते पद्मश्री या सर्वोच्च नागरी किताबानं सन्मानित करण्यात आलं होतं. सध्या विस्मरणात चाललेल्या, सळयांच्या

माध्यमातून केल्या जाणाऱ्या बोलक्या बाहुल्यांचे खेळ जिवंत ठेवत सळई बोलक्या बाहुल्यांच्या नृत्याला चालना देण्यात त्यांचं महत्वपूर्ण योगदान राहीलं होतं.

<><><><><>

दक्षिण आफ्रिकेत बुधवारी झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीचे आंशिक निकाल जाहीर झाले असून त्यानुसार देशात प्रथमच आघाडीचं सरकार येण्याची चिन्हं दिसत आहेत. सत्ताधारी अफ्रिकन नॅशनल काँग्रेस बहुमतापासून दूर असल्याचं चित्र असून त्यांना आतापर्यंत ४१ टक्के मतं मिळाली आहेत. या पक्षानं वर्णद्वेष संपुष्टात आल्यापासून गेल्या तीस वर्षांमध्ये सतत बहुमत मिळवलं होतं आणि गेल्या निवडणुकीत २०१९ मध्ये सुमारे ५७ टक्के मतं मिळवली होती.

विरोधी पक्षांपैकी डेमोक्रॅटिक अलायन्सला २१ टक्के मतं मिळाली आहेत तर देशाचे माजी अध्यक्ष जेकब झुमा यांच्या एमके पक्षानं १३ टक्के मतं मिळवली आहेत.

<><><><><>

गाझा पट्ट्यातला संघर्ष संपवण्यासाठी इस्राएलनं दिलेल्या नविन प्रस्तावाला मान्यता देण्याचं आवाहन अमेरिकेचे अध्यक्ष जो बायडन यांनी केलं आहे. या प्रस्तावाला मान्यता दिल्यास सहा आठवड्यांच्या युद्धबंदीने सुरुवात होऊन इस्राईलच्या संरक्षण दलांची गाझा पट्ट्यातून हळूहळू बाहेर पडायला सुरुवात होणार आहे. यामुळे मानवतावादी मदतीचा ओघ आणि ओलिसांची सुटकाही करण्यात येणार आहे. आतापर्यंत झालेला आणि अत्यंत गंभीर रूपात सुरु असलेला हा संघर्ष संपुष्टात आणण्याचा हा सर्वोत्तम मार्ग असल्याचं अमेरिकेच्या अध्यक्षांनी म्हटलं आहे. मात्र सर्व ओलिसांची सुटका होत नाही आणि हमासचं लष्कर माघार घेत

नाही तोपर्यंत युद्ध सुरूच राहील असं इस्त्राएलचे प्रधानमंत्री बेंजामिन नेत्यानाहू यांनी जारी केलेल्या प्रसिद्धिपत्रकात म्हटलं आहे.

**<><><><><>**

लाल समुद्रात अमेरिकेच्या आयझेनहावर या विमानवाहू नौकेवर आपण क्षेपणास्त्र डागल्याचं येमेनमधल्या हौती गटाने सांगितलं आहे. येमेनमधल्या हौती गटाच्या विविध तळांवर अमेरिका आणि ब्रिटनने काल रात्री केलेल्या हल्ल्याला हे प्रत्युत्तर असल्याचं हौती गटाचे लष्करी प्रवक्ते याह्या सारेआ यांनी म्हटलं आहे. अमेरिकेच्या हल्ल्यात हौती गटाचे १६ जण मृत्यूमुखी पडल्याचंही सारेआ यांनी सांगितलं.

**<><><><><>**

उष्माघातामुळे देशाच्या विविध भागात गेल्या दोन दिवसांत ५० हून अधिक मृत्यू झाले आहेत. त्यापैकी सर्वात जास्त म्हणजे २२ जणांचे मृत्यू ओडिशामध्ये झाल्याचं वृत्त आहे.

हरियाणा, पंजाब, दिल्ली, राजस्थान, उत्तर प्रदेश, ओदिशा, बिहार आणि झारखंड राज्यात आज तीव्र उष्णतेची लाट राहणार असल्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. तसंच मध्यप्रदेश, छत्तीसगड, उत्तराखंड आणि आंध्रप्रदेशात देखील उष्णतेची लाट राहील असं हवामान विभागानं सांगितलं आहे.

**<><><><><>**

केरळमधल्या काही भागात काल जोरदार पाऊस झाल्याचं हवामान विभागाने कळवलं आहे. इडुकी जिल्ह्यात विजांचा कडकडाट आणि मेघगर्जनेसह पाऊस झाला. जिल्ह्यातल्या अरक्कुलम आणि वेरियामट्टम इथं भूस्खलन झाल्याचंही समजतं.

आंध्रप्रदेशातल्या काकीनाडा आणि कोनसीमा जिल्ह्यात आज सकाळी वादळी वाऱ्यासह गारपीट झाली. तर अन्नवरम, पिटपुरम आणि रामचंद्रपुरम इथं मुसळधार पाऊस झाला.

ईशान्य भारत आणि पश्चिम बंगालमध्ये पुढल्या सहा दिवसांत मध्यम स्वरुपाचा पाऊस पडेल. बिहार, झारखंड, ओदिशा आणि छत्तीसगडमध्येही पुढल्या चार दिवसांत पाऊस पडणार असल्याचा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**//<><><><><>//**

आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र -दुपारी १.३० वाजता
१ जून २०२४ - शनिवार

आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र -दुपारी १.३० वाजता
१ जून २०२४ - शनिवार